# प्रकरण पाचवे

# स्त्रीच्या भाषेची वैशिष्ट्ये

- **स्त्रीच्या भाषेची वैशिष्ट्ये –साहित्यीक दृष्टी**

स्त्री-रंग या पुस्तकात माधवी कुंटे यांनी "तिची भाषा" या लेखात स्त्रीच्या भाषेची वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

देहबोली स्त्रीच्या भाषेचं अविभाज्य अंग असतं, स्त्रीची देहबोली हे तिच्या भाषेचं अविभाज्य अंग असतं. शिवाय स्त्री असल्यामुळे तिच्या शब्दांना शालीनता हवी, मर्यादा हवी हेही परंपरेने घालून दिलेल बंधन असतच. म्हणून सगळी व्याकूळता, राग , प्रेम, लोभ, माया डोक्यात उमटते. त्याला शब्दांची जोड मिळते तेव्हा स्त्रीच्या भावनांचा अविष्कार होऊ शकतो. स्त्रीच्या बोलण्यात रुक्षपणा कमी असतो. बोलायचं तेवढं मुद्द्यांपुरतं बोलून सोडून देण्याची वृत्ती नसते. तिच्या भाषेत, संबोधनात ओलावा असतो. संवाद थेट मनापर्यंत पोहोचावा अशी तिची धडपड असते. तिचं जगणं हे फक्त बुद्धी आणि तर्क याच्या आधारावर उभं नसतं खरं तर भाषा ही वेळप्रसंगी स्त्रीचं हत्यार होते. त्यांचा संताप, राग, द्वेष भाषेतून प्रकट होतो. म्हणून त्या भाषेला उपहासाची किनार, जोरकसपणा असे सगळे अलंकार स्त्रिया हवे तेव्हा चढवीत असतात.

स्त्रीच्या भावविश्वाशी, स्वभावाशी निगडीत गोष्टी कायम असल्याने तिची भाषा वैशिष्ट्ये मात्र अजून कायम आहेत. त्यातलं सौंदर्य, लय, ठसका, अलंकरण अजून आपल्या अनुभूतींशी इमान राखीत सहीसलामत राहिली आहेत.

---

**कुंटे माधवी, स्त्रीरंग 'तिची भाषा', सायली प्रकाशन, पुणे प्र.आ. २०१० पृ. ७४-७५**

## अ) आमदार स्त्रियांच्या व्याख्यानामधील परिवर्तनाचा आलेख

**राजकीय परिवर्तन**: १९६० च्या दशकातील स्त्री आमदार त्या काळची परिस्थिती राजकीय, सामाजिक मर्यादा, खडतर प्रवास, निधीची उणीव, पगार जेमतेम, स्विय सहाय्यक केवळ फाईल वागवणारा, सोशल मीडिया कार्यरत नव्हता. प्रवासाची सहज सोय नव्हती. त्यामुळे मतदारांशी सरळ सरळ संपर्क साधून कामाचा आढावा घ्यावा लागायचा.

आज सोशल मीडियाचा जमाना आहे, संगणक, आयपॅड, लॅपटॉप, मोबाईल या सर्व सुविधा सहज उपलब्ध झाल्यामुळे त्वरित माहिती मिळणे हे आज सोपे झाले आहे. संपर्क ही त्वरित साधता येतो. त्यामुळे लाईव्ह माहिती कळते. भाषणात त्याचा वापर

लगेच करता येतो. संपर्क करायचा तर तो अधिकारी, मंत्री, आमदार, मतदार, विषयतज्ञ या सर्वांशी क्षणात संपर्क होत असल्यामुळे विषयाचे वास्तव चित्रण उभे करण्यात याचा फार मोठा फायदा झाला आहे.

संगणकामुळे कामही सोपे झाले आहे, शैक्षणिक अभिवृद्धीही झाली आहे. आज वागण्या बोलण्यात पेहरावात आधुनिकता आली आहे. विचारांची व्याप्ती वाढली आहे. दूरदर्शीपणा त्यात आल्याचे जाणवते. वाङ्मयीन मूल्यमापन करताना अभ्यासाचा विषय जरी हा असला तरी स्त्री – आमदारांच्या भाषणात वाङ्मयीन दृष्टीकोण नगण्य दिसतो. त्यात सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक पैलूंचा अनुभव जास्त दिसतो. लेखिका, शिक्षिका आमदार तथा यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब भारदे यांच्या भाषणांना वाङ्मयीन महत्व प्राप्त झाले आहे.

**वाङ्मयीन मूल्ये** : एखादी कलाकृती वाचल्यावर आपण तिच्याबद्दल काही अभिप्राय देतो. हा अभिप्राय कधी गौरवाच्या स्वरूपात असतो तर कधी टिकेचे स्वरूपात होतो. तेव्हा ज्या मूल्यांच्या आधारे आपण त्या साहित्याचे मूल्यमापन करीत असतो. त्या मूल्यांना वाङ्मयीन मूल्ये असे म्हणतात.

**सौंदर्यमूल्य :** जीवनमूल्ये आणि वाङ्मयीन मूल्ये यात मुख्यतः भेद म्हणजे जीवनमूल्यांच्या प्रकाशात वाटचाल केली तर उच्च स्वरूपाचे आणि यशस्वी असे जीवन जगता येईल. या मूल्यांचे साहित्यात उपाययोजन केले तर जीवनाचा श्रेष्ठपणा त्यातून प्रतीत होईल. पण वाङ्मय एवढ्यावरच तृप्तता मानत नाही, समाधान मानत नाही. चर्मचक्षूंना जाणविणारे जीवनातील सौंदर्य जीवनानुभव हे तर स्वरूपाचे जीवनदर्शनही घडविते. जीवनमूल्ये ज्यावेळी ओठबंद करून ठेवतात/ बसतात त्यावेळी वाङ्मयीन मूल्ये साकार होतात आणि जीवनाची एखादी तरलमय अशी छटा दर्शवितात. यातच साहित्याचे श्रेष्ठत्व सामावलेले आहे.

श्रीमती उषाताई दराडे – त्यांच्या बोलण्यातून वास्तवचित्रण समोर उभे राहते. यांच्या भाषणातल्या विषयांचा आवाका मोठा आहे. विषयांच्या व्याप्तीच्या बाबतीत सांगावयाचे झाल्यास त्या सर्वच विषय मग तो कुणाचा शोकप्रस्ताव असेल महिला सबलीकरणाचा विषय असेल, अर्थसंकल्पावरील चर्चा असेल वा पर्यावरणाच्या समस्यांविषयी असेल ग्लोबल वॉर्मिंग विषयही त्या त्याच चिंतनाने आणि वैचारिकतेच्या पातळीवर अभ्यासपूर्ण हाताळतात. त्याला अपवाद शेतकरी, घनकचरा व्यवस्थापनाचाही नसतो. महिला सबलीकरण या विषयावर त्या स्त्रीवादी भूमिका मांडतात. महिला परिस्थितीने गुन्हेगार होऊन कारागृहात जातात असे त्या म्हणतात म्हणजे त्यांनी भाषणांपूर्वी त्यांची भेट त्यांचा अभ्यास केलेला दिसून येतो. त्यासाठी अशा गुन्हेगार स्त्रियांना शिक्षण देण्यापासून तिच्या आरोग्याविषयी जबाबदारी आणि तिच्या पुनर्वसनाची जबाबदारी राज्यसरकारची आहे. तसेच अनेक कारागृहात (हर्सुल कारगृह, नागपूर येरवडा) पुरूषांसाठी ज्या सोयी आहेत, त्या महिलांसाठी नाहीत हा भेदभाव का? असा

जाबही त्या विचारतात. यातून रोखठोकपणा दिसून येतो. एक स्त्री या नात्याने स्त्रियांची त्यांच्या मनोवस्थेची, त्यांना समाजाकडून मिळणाऱ्या वागणूकीची, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव त्यांना आहे. त्या ती समजू शकतात. एक संवेदनशील स्त्री त्यांच्यात आपल्याला दिसते. एक सच्ची समाजकर्ती पहावयास मिळते. महिला सबलीकरणावर त्यांचा भर दिसतो. त्यांच्या महिलांच्या समस्यांचे निरसन करताना मातृत्वाचा ओलावा जाणवतो.

भाषा प्रमाणभाषा असून त्यात वास्तविकता आहे. चिंतन आहे, भावनिक तथा मातृत्वाचा ओलावा आहे. महिलांची क्रयशक्ती वाढविणे त्यांच्या श्रमशक्तीला प्रतिष्ठा देणे, पतपुरवठा करणे, विस्थापित होणे, कार्यक्रम हाती घेणे, भर देणे, मार्गदर्शन करणे, विसंबून राहणे, मार्ग काढणे, आबाळ होणे, वंचित रहाणे, तरतूद करणे, प्राधान्य देणे, काळजाचा तुकडा असणे, पावले उचलणे, वाटा उचलणे, मागासलेपण दूर करणे या सर्व भावभावनांचा समावेश त्यांच्या भाषणांतून झालेला दिसतो. महिला आमदार जिव्हाळ्याची आत्मनिष्ठा आणि बेरका राजकारणीपणा यातील अंतर सूचकपणे दाखवतात हे या ठिकाणी सिद्ध होते.

महिला आयोगाच्या सदस्या म्हणून काम केलेले असल्यामुळे कायद्याच्या बाबतीतही त्या सुधारणा सुचवतात. स्वतः वकील असण्याचा पुरेपुर उपयोग कायदा सुचवताना त्या करतात.

इंग्रजी शब्दांचा वापर – विमेन ॲग्रीकल्चररिस्ट , रिसर्च सेंटर, रिमांड होम, शॉर्ट स्टे होम, ओरिएंटेड, रूरल ओरिएंटेड विकास सेक्शन, कन्सेप्ट, कंपोस्ट ग्लोबल वॉर्मिंग, सॉफ्टवेअर इंजिनियर, डी क्लास, ट्रफिकिंग ॲक्ट, कॉपींग पॅटर्न, बॅकलॉग, प्रॉपर्टी, इन्फ्रास्ट्रक्चर, थीम ऑफ द सोसायटी, स्प्रिंकलर, पाब्लिसिटी फेडीट नॉर्मस, फायनान्स, फिशरी डेअरी, डोमेस्टीक व्हायलन्स ॲक्ट, अमेंडमेंद्ध, रिलिज, डेव्हलप, गार्डन्स, ड्राईव्ह, पोझिशन्स, मिडिया सॅटेलाईट, मोबाईल्स, चॅनेल्स, कमर्शियल प्लान, एस्टिमेंट सेशन, बजेट इंग्रजी शब्दांचा वापर अस्खलितपणे त्या करतात.

वाक्प्रचारांचा वापर – परिचित आहे उमेद संपणे, निराशा निर्माण होणे, जगण्याची उमेद देणे, शिफारस करणे, अंमलबजावणी करणे, झळ पोहोचणे, मेळ बसणे, समाविष्ट होणे, निर्मूलन करणे, नियोजन करणे, श्रमाचा मोबदला देणे, कानामागून येऊन तिखट होणे, अक्काबाईचा फेरा अशा प्रकारे त्याला वाङ्मयाची किनारही लाभलेली दिसते.

डॉ. निलम गोऱ्हे , अनुभवाचा साठा, कायद्यांचा अभ्यास, प्रमाण भाषेचा वापर, भावनेचा इंग्रजी प्रस्फोट, मीडिया, पोस्टमार्टेम, निग्लेक्ट, फॉरेन्सिक, रिपोर्ट केस सोर्सेस,

घटनेत कुणीतरी व्यक्ती जी मोठी आहे. आरोपींना संरक्षण देणारी आहे असे स्पष्ट बोलण्याचे धाडस समर्पक उदाहरणे, संपर्क दांडगा, सुसंवादातून अभिव्यक्ती अडचणीचे निराकरण उपाययोजना, चेहऱ्यावरील भावही बोलके असतात. साधारण वाङ्मय किनार!

**नीला देसाई** – नीला देसाई यांच्या भाषणांचा विचार करता त्यांची भाषा ही प्रमाणभाषा असून त्यांच्या भाषेत वाक्प्रचारांचा सहज वापर आपल्या लक्षात येतो. त्यांची भाषणे वाचताना ती अभ्यासपूर्ण आहेत. हेही सहज कळते, कोणताही विचार मांडताना समाजातील प्रत्येक घटकाचा विचार त्यांनी केलेला आहे. त्या विचाराची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय अशा बाजूचाही विचार त्या करतात त्यांच्या भाषणात स्पष्ट वक्तेपणा आहे. रोखठोकपणा आहे उदा. त्या म्हणतात,"विरोधी पक्षनेत्यांनी या अर्थसंकल्प अर्थशून्य आहे, अर्थहीन आहे" असे सांगितले त्यांचे भाषण ऐकताना मला असे वाटते की ते भाषण त्यांना कोणीतरी लिहून दिले आहे.

**वाक्प्रचाराचा उपयोग** – या अर्थसंकल्पाद्वारे वचनपूर्ती केलेली आहे. गरीबी हटाव चा नारा, विकासाची गंगा आणणे, तोंडवळा बदलणे

**वाङ्मय मूल्ये** – विचार आणि भावना हृदयस्पर्शी, आशय आणि अभिव्यक्ती, स्वातंत्र्य – संस्कृती,

स्त्रीवादी, भावनात्मक, चिंतनात्मक, मातृत्वाचा ओलावा, भाषेतील झणझणीतपणा (इंग्रजी वाक्ये) बोलीभाषा, प्रमाण भाषा, भाषेतील गोडवा व भावनिकता, काव्यमय वापर दिसून येतो.

**मृणाल गोरे** – अनुभवाचा डोंगर, प्रगाढ अभ्यास, भावनेचा ओलावा, वास्तविक, विकासाचे भान राष्ट्रसंपत्तीचा उपयोग आपल्याच देशाला होणे गरजेचे ही भावना, भाषा साधीसोपी, समाजवादी विचार, सामाजिक समरसतेवर भर, विचारांचा ठामपणा, उपाययोजना, पाठपुरावा, गरीबी दूर करण्यासाठीचे प्रयत्न आंदोलकाची भूमिका सदैव जागृत ठेवणे, ही मृणाल गोरेंच्या भाषणाची वैशिष्ट्ये म्हणायला हरकत नाही.

आशय – अनुभवाच्या चित्रणानेच वाङ्मयाला आशय प्राप्त होणे

सामाजिक, धार्मिक, राजकीय, कौटुंबिक इ. प्रकारचे जीवनदर्शन साहित्याने स्पर्श करावा. स्वाभाविकपणे हे घटक कलाकृतीतून साकार झाले पाहिजेत.

## ब)१९६२ ची आमदार स्त्री व आत्ताची आमदार स्त्री

१९६२ ची आमदार स्त्री काम करत असताना, आत्तासारख्या सुविधा नव्हत्या, सुरूवातीला पगारही नसायचा. कार ने प्रवास करताना एस.टी रेल्वेने प्रवास, कोणत्याही घटनेची माहिति घ्यायची तर प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाण्याशिवाय गत्यंतर नसायचे. आज विमान भत्ताही आमदारांना मिळतो, संगणक युग आहे. सोशल मीडीया मुळे त्वरित माहिती मिळते. स्विय सहाय्यकालाही भरपूर पगार मिळतो. त्यामुळे तो फक्त पेपर वागविण्याचे काम न करता, माहिती जमा करण्याचे ऑफिसवर्क, प्रश्न तयार करणे हे सर्व तो पाहतो.

त्या काळात आमदारांनाच वाचन, मनन, लिखाण करावे लागायचे. संपर्काची साधणे अपुरी होती. त्यामुळे त्या काळच्या महिला आमदार संपर्कात आघाडीवर होत्या. त्याच्या गोष्टींशी अनुभवांची शिदोरी सतत असायची. प्रसंगानुरूप त्वरित पोहोचणे, गाठीभेटी चर्चा

यावर भर असायचा. आज दूरदर्शनसारखे प्रभावी माध्यम आहे. असंख्य चॅनेल्स त्याच्यावर आहेत, त्यावर विविधविषयावर चर्चा होत असते. महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशातल्या व जगातल्या कानाकोपऱ्यात काय घडतेय यांचा वृत्तांत पहायला मिळतो. त्यामुळे ज्ञानात भर पडते. शिवाय गुगल हे एक महाभंडार आहे. प्रत्येक विषयाची माहिती रेकॉर्डसहित पहायला मिळते. ऐनवेळचा विषय जरी चर्चेला आला तरी, माहिती त्वरित मिळते. त्या विषयांवरची पुस्तके शोधा. वाचा टिपण करा हे करावे लागत नाही. १९६२ च्या आमदार स्त्रियांना या दिव्यातून जावे लागायचे. त्याकाळी मेहनत होती. परंतु त्यामुळे बोलण्यात वस्तुनिष्ठपणा, ठामपणा व परिपक्वता दिसायची. त्याकाळची आमदार स्त्री रूढी-परंपरा, संस्कृती जपणारी, या गोष्टींना महत्व देणारी होती. आजची आमदार स्त्री या विषयांवर गंभीर बोलेलच असे नाही. काळ बदलला आहे. राहणीमान बदलले आहे. विचारही बदलले आहेत. परिणामही बदलले आहेत. बुरसट विषयांना आत्ता प्राधान्य दिले जात नाही. फेसबूक, व्हॉट्सॲप, ई-मेल, ट्विटर याचा वापरही आज केला जातो. एकूण दोन काळातली तुलना सविस्तरपणे प्रस्तुतकर्तीने प्रबंधात केली आहे.

जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर आहेत. तशात या तथाकथित धार्मिक – अध्यात्मिक क्षेत्रात आहेत. उच्च शिक्षित, उच्च उत्पन्न स्वतः मिळवणाऱ्या स्त्रियाही कधी स्वामी, गुरू, एखादे देवस्थान, संस्था, धार्मिक याच्याशी संबंधित आहेत. गुरूंच्या अनुग्रहीत आहेत, मंदिरात रांगा लावणारे तरूण-तरूणी आणि या स्त्रियाही आहेत. मनःशांतीसाठी विपश्यना, एस.एस.वाय. अशा उच्चभ्रू आध्यात्मिक संस्थांचे ‘कोर्स’ – अभ्यासवर्ग, करीत आहेत. हे सगळे विवेकी माणसाला चक्रावून टाकणारे आहे. भौतिक समृद्धीच्या लाटेवर तरंगताना मने भयग्रस्त आहेत. कुठल्यातरी अनामिक दडपणाखाली आहेत. तरूण मुला-मुलींशी, मध्यमवयीन स्त्रियांशी बोलताना हे प्रकर्षाने जाणवते. वरवर बेफिकीर दिसणारी ही मंडळी आतून फार अस्थिर असल्याचे दिसून येते.

घरात- बाहेर सर्वत्र स्त्री असुरक्षित आहे. केवळ ती स्त्री आहे. मादी आहे म्हणूनच! तिच्यात मोकळेपणा मुक्तता वाढलेली दिसते आहे. पण हे एका मर्यादेपर्यंतच खरे आहे. प्रदर्शनीय व्यवस्थेला तिला सदैव प्रेझेंटेबल राहण्याची परिस्थितीजन्य सक्ती आहे. अशी तिच्या अंतर्मनाची धारणा होत आहे.

### क) अभ्यासकर्तीच्या निष्कर्षातून महिलांच्या भाषणांचे वाङ्मयीन मूल्यमापन

मराठी भाषेचे शिवाजी विष्णूशास्त्री चिपळूणकर येथपासून कुरूंदकर – भास्कर लक्ष्मण भोळे येथ पावेतो मराठी निबंधकार गद्यलेखकांनी मराठी भाषा- साहित्य-संस्कृतीचे विचारपूर्वक परिशीलन केले आहे. त्या दृष्टीने विचार करता सभागृहातील व्याख्याने ही ३,५०० वक्त्यांच्या भाषणांमधून उमटून येईल असे मानणे चुकीचे ठरेल, तथापि गद्यकारांचा जिव्हाळा हा स्त्री-पुरूष आमदारांच्या भाषणांमधून ओतप्रोत नसला तरीही तो आहे, असे निदर्शनास येते. स्त्री-पुरूष आमदार हे विदग्ध गद्यकार असले तरीही ‘अंतरीचे धावे, स्वभावे बाहेरी’ या उक्तीनुसार

त्यांच्या व्याख्यानातून कुठे कुठे वाङ्‌मयीन कसोटीवर उतरणारा परिचय घडून आल्याखेरीज रहात नाही.

यात स्त्री- आमदारांचे प्रमाण, संख्येने कमी असले तरीही आशयानुरूप अधिवक्त्याचे आहे, असे सूचित करता येईल.

स्त्री आमदारांच्या भाषणातील भाषासाहित्याचा विचार करता, शब्दक्रम ठरवून नाही शब्दातला अभिनय भावला, तरच तो कळतो. साहित्याचा बाजार मांडायचा नाही. यातून आलेल्या उमाळ्याचे अंतरंगातील उकल, शब्दातील मूल्य, शब्दातील अभिनय आणि वक्तृत्व. परफॉर्मींग आर्टनुसार वाङ्‌मयीन मूल्ये सापडणार नाहीत. ढळढळीत वास्तवाला धरून आहेत.

**<u>वास्तवदर्शी निकष</u>**

वैचारिक मूल्यांचे निकष लावताना का डावी वाटतात. त्या त्या वेळेचा प्रश्न, त्या वेळचा उद्वेग, उग्ररूप धारण करू शकतो, शब्दक्रम, वक्तृत्वातील अभिनयता अन्यायाच्या, अत्याचाराच्या वेळची तिची भाषा धारदार असते. स्त्री- आमदारांच्या भाषणांमध्ये कदाचित वाङ्‌मयीन मूल्ये सापडणार नाहीत. पण त्यामागची भावना ही सुद्धा लक्षवेधी असते. भाषाशैली पाहता ती, जे बोलते त्याचे चित्र आपल्या डोळ्यासमोर आल्याशिवाय राहत नाही. चित्रमय भाषाशैली जाणवते.

वक्तृत्वाचा होणारा परिणाम, नाटकाचा परिणाम हा प्रभावी असतो. ग्रामीण भागातील, तसेच विदर्भ, मराठवाडा बोलीचा हेल वेगळा असतो. तो त्या भागातील स्त्री आमदारांच्या भाषणातून आढळतो. मातीतून उगवलेल्या बायका आहेत ह्या त्यामुळे त्यांच्या वक्तृत्वातून ती बोली आलेली आहे.  भावना प्रधानता, मातृत्वाची भावना स्त्री आमदारांमध्ये येतेच येते. समन्वयकाची भूमिका ही येते.

स्त्री – आमदार ह्या पुरूष आमदारापेक्षा सक्षम आहेत असे म्हटले तर काही वावगे होणार नाही. खरतरं यासाठी विधानसभा व लोकसभेमध्ये महिलांना आरक्षण मिळणे गरजेचे आहे. संस्कृती ही सण समारंभामध्येच आहे असे नाही. मूळातच निर्भय असणारी व्यक्ती स्पष्टपणे बोलणारी असते.

स्त्री आमदारांना कोणतेही विषय निषिध्द वाटत नाहीत. नवीन विषय समजून घेणे, वाचन करणे, अनुभव घेणे, त्या पसंत करतात. अभ्यासाशिवाय त्या बोलत नाहीत. प्रत्येक प्रसंग घटना त्या आपल्या डोळ्यात साठवत असतात. प्रत्येक घटनेमागील कारणांची मीमांसा करणे त्यांना आवडते. वरपांगी विचार त्यात नसतो. मूळातच स्त्री – प्रवृत्ती अशी असते कि, जे आपण करू ते प्रशंसनियच ठरले पाहिजे. या भावनेतून ती कामाला लागते. कोणताही विषय जर भावला तर तो तडीस नेण्यासाठी प्रयासही करते.

स्त्रियांच्या समस्या विविध स्तरातील, विविध समस्यांमागील कारणे शोधणे, संशोधन करणे, तिला आवडते. सहजासहजी एखादी गोष्ट त्या मान्य करत नाहीत. त्याच्या मुळाशी जाण्याचा त्या प्रयत्न करतातच. त्याशिवाय त्या शांत बसू शकत नाहीत.